## पुणे

### तंत्रज्ञानातील संशोधनासाठी निधी उभारावा : एस. शिवराम

पुणे, ता. १८ : सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांनी एकत्रित प्रयत्नांतून विज्ञान आणि तंत्रज्ञानातील संशोधनाकरिता मोठ्या प्रमाणावर निधी उभा करावा, असे आवाहन राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक एस. शिवराम यांनी आज येथे व्यक्त केले. ......

....... फ्लुएंट इंडिया कंपनीने आयोजिलेल्या 'कॉम्प्युटेशनल फ्ल्युईड डायनॅमिक्स' (सीएफडी) या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. उद्या व परवाही ते सुरू राहणार आहे. जनरल इलेक्ट्रिकच्या जॉन वेल्श टेक्नॉलॉजी सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी दामोदर पाधी, 'यूआयसीटी'चे संचालक प्रा. जे. बी. जोशी, बंगळूर येथील 'आयआयएससी'चे प्रा. एस. एम. देशपांडे, सिंगापूर येथील 'आयएचपीसी' कंपनीचे कार्यकारी उपसंचालक डॉ. कुरिची कुमार, फ्लुएंट इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. फेरिट बॉयसन, डॉ. दीपांकर चौधरी, डॉ. मुरली कादीरसंगल्म आदी या वेळी उपस्थित होते.

'सीएफडी' तंत्रज्ञानातील सध्याचे प्रवाह व भारताला या क्षेत्रात असलेल्या संधी यावर चर्चा करण्यासाठी हे चर्चासत्र आयोजिण्यात आले आहे. डॉ. शिवराम म्हणाले, ''कोणत्याही उद्योगात सध्या सतत नवनवे संशोधन होत राहणे महत्त्वाचे ठरत आहे. अशा संशोधनांची साखळी निर्माण करण्यासाठी आपल्या उद्योगप्रक्रिया, उद्दिष्टे नव्याने ठरवायला लागणार असून, त्यामध्ये 'सीएफडी'चा चांगला वापर होऊ शकेल.''

काही संशोधन संस्था आणि कंपन्यांचे प्रतिनिधी या चर्चासत्रासाठी उपस्थित आहेत.



All Information and pictures on this site are copyrighted material and owned by their respective creators or owners publication, copying, broadcasting or retransmission of the information or pictures without the written permission of the copyright holder is prohibited.